# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ११७ वा ❑ भारतीय सौर दिनांक २७ ज्येष्ठ शके १९४८, बुधवार दि.१७ जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### रुग्णवाहिकेकडे डोळे लावून बसलेल्या पत्नीची पाठीवरील जीवघेणी वारी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात व्हीलचेअर किंवा स्ट्रेचर न मिळाल्यामुळे एका आदिवासी महिलेला आपल्या आजारी पतीला पाठीवर उचलून उपचारासाठी इकडेतिकडे फिरावे लागल्याची संतापजनक घटना घडली आहे महिलेचा पती गंभीर आजारी होता आणि त्याला चालता येत नव्हते. रुग्णालयात कोणतीही मदत न मिळाल्यामुळे तिने पोटाला बॅग, एका हातात लहान मुले आणि पाठीवर आजारी पतीला घेऊन डॉक्टर व नर्सचा शोध घेतला

ही एक अत्यंत हृदयद्रावक आणि वास्तवदर्शी घटना आहे, जी आपल्या आरोग्य व्यवस्थेतील अपयशाचे विदारक सत्य दर्शवते. रुग्णवाहिका वेळेवर न मिळाल्यामुळे किंवा दुर्लक्षित केल्यामुळे एका असहाय्य पत्नीला आपल्या आजारी किंवा मृत पतीला पाठीवर वाहून नेण्याची जीवघेणी वारी करावी लागणे, हा संवेदनशील व्यवस्थेचा आणि माणुसकीचाही अंत मानला जातो.अशा गंभीर आणीबाणीच्या प्रसंगी प्रशासनाकडून त्वरित वैद्यकीय मदत मिळणे अत्यंत गरजेचे असते.

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून  नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेत रुग्णालय प्रशासनाने सविस्तर चौकशीचे आदेश दिले आहेत.

जीवघेणी वारी हा शब्दप्रयोग आरोग्य व्यवस्थेतील भीषण वास्तव आणि वेदना दर्शवतो. वारीमध्ये किंवा इतर प्रवासादरम्यान रुग्णवाहिका वेळेवर न मिळणे आणि त्यामुळे कुटुंबावर कोसळणारा आघात अत्यंत दुर्दैवी आहे. विशेष म्हणजे

महिलेच्या एका हातात लहान मूल आणि पोटाला बॅग असतानाही, सुरक्षारक्षक किंवा कर्मचाऱ्यांनी तिला तत्काळ मदत केली नाही.

महाराष्ट्रासह अनेक भागांतील शासकीय रुग्णालयांमध्ये (विशेषतः अकोला, नांदेड व इतर ठिकाणी) मूलभूत सुविधांचा अभाव आणि खाटा व स्ट्रेचर न मिळण्याच्या गंभीर घटना समोर येत आहेत. व्हीलचेअर किंवा स्ट्रेचर वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे, हतबल नातेवाईकांना आपल्या आजारी किंवा दिव्यांग रुग्णांना पाठीवर किंवा खांद्यावर वाहून नेण्याची दुर्दैवी वेळ येत आहे.

शासकीय रुग्णालयात वेळेवर स्ट्रेचर किंवा व्हीलचेअर न मिळणे, ही आरोग्य व्यवस्थेतील मोठी त्रुटी दर्शवते.

शासकीय रुग्णालयांमध्ये तज्ज्ञ डॉक्टर, अपुरे कर्मचारी, मोफत औषधांचा तुटवडा, आणि आधुनिक चाचणी उपकरणांचा (उदा. एमआरआय, सोनोग्राफी) अभाव या प्रमुख समस्या जाणवतात. यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत आणि आर्थिक भूर्दंड सहन करावा लागतो.

अनेक रुग्णालयांमध्ये मंजूर पदांपेक्षा खूप कमी डॉक्टर आणि नर्सेस उपलब्ध असतात. यामुळे एकाच डॉक्टरावर प्रचंड ताण येतो. गंभीर आजारांवरील आवश्यक औषधे, सर्जिकल साहित्याची उपलब्धता नसते. रुग्णांना बाहेरून महागड्या औषधी खरेदी कराव्या लागतात. एक्स-रे, सोनोग्राफी मशिन्स अनेकदा बंद असतात किंवा जुन्या तंत्रज्ञानाची असतात. ओपीडी  मधील लांब रांगा, स्वच्छतागृहांची दुरवस्था आणि अपुऱ्या बसण्याच्या जागांमुळे रुग्णांचे हाल होतात.

शासकीय रुग्णालयासाठी कोट्यवधी रुपयांच्या भव्य इमारती आणि आधुनिक यंत्रसामग्री उभारली जाते; पण प्रशिक्षित डॉक्टर, नर्स आणि इतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असतात लाखो रुपयांची महागडी उपकरणे  धूळ खात पडलेली असतात किंवा ती चालवणारे तंत्रज्ञ नसतात.औषधांचा तुटवड्यामुळे गोरगरीब रुग्णांना बाहेरून औषधे विकत घ्यावी लागतात. यामुळे वेळेची आणि पैशांची मोठी नासाडी होते. सामान्य जनतेचा या व्यवस्थांवरील विश्वास उडाल्यामुळे, गरिबीतही त्यांना कर्ज काढून महागड्या खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतो.

आपत्कालीन परिस्थितीत खासगी वाहनांसाठी पैसे नसणाऱ्या गरीब आणि आदिवासी रुग्णांसाठी रुग्णालय प्रशासनाने 'गोल्डन अवर' चे महत्त्व ओळखून तातडीने मदत पुरवणे कायद्याने आणि नैतिकतेने बंधनकारक आहे.

# मराठवाडा महाराष्ट्र दुष्काळाच्या वाटेवर?

ज्योतिर्मय साहित्य

नेमेचि येतोय पावसाळा या म्हणीनुसार दरवर्षी ७ जुनला पाऊस हमखासपणे येतोच. नाही म्हणायला एक दोन दिवस मागे पुढे होतात. परंतु यंदा पावसाला काय झाले कुणास ठाऊक ? हवामान तज्ञ जाणकार यांनी वर्तविलेले सर्व अंदाज या वर्षी सफशेल फेल ठरत आहे. प्रथम ३ जुनला, नंतर ६-७ जुनला मान्सून पाऊस दाखल होणार, नंतर १४ जुनला येणार, परंतु पाऊस काही यायला, पडायला तयार नाही. ना काळयाकुट्ट ढगांचा जमावडा, ना विजांचा गडगडाट नुसता रातीला सुटतोय जोराचा वारा, पावसाला नाही देत थारा असेच म्हणावे लागेल. आता तर मिरग कोरडा ठाक निघुन गेला व पूर्ण जून महिना असाच विना पावसाळा निघून जातो की काय अशी भीषण परिस्थिती दिसत आहे. पाऊस पडण्याची अजिबात सुतराम शक्यता दिसत नाही. यामुळे शेतकरी बळीराजा हा चिंताक्रांत झाला आहे. तो हातघाईस येऊन नुसुत्या निळया-निळया कोरडल्याठाक आभाळाकडे चातक पक्षाप्रमाणे एक टक लावून वरुण राजाची आतुरतेने वाट पाहत आहे. आज तरी पडेल, राती तरी पडेल, उद्या तरी पडेल पण पाऊस यायला तयार नाही. पाऊस कुणाला नको आहे, तर सर्वांना हवा आहे. ती मुकी जनावरे बिचारी बघा ना. गायी, म्हशी, शेळ्या, मेंढर या जनावरांची पाणी पिण्याचे बेहाल होत आहे. वाऱ्याच्या लहरीवर येणाऱ्या पावसात त्यांना चिंब भिजवून जायचे आहे. गाय-वासरांना पावसाच्या पाण्यात, गाय-वासरांना शेपटी उंचावऊन उधळत-उधळत, खिदळत मनमुराद आनंद लुटायचा आहे. पक्षी पाखरांना या झाडावरुन त्या झाडावर पावसात भुर्रकन झेप घेऊन पाऊस गाणे हे गीत मधुर स्वरात गायचे आहे. जो तो पावसाची वाट पाहतोय. पाण पाऊस लांबणीवर जातोय का कुणास ठाऊक ? एक ओठावरी गीत येतेय –

रुसला गं बाई रुसला
कोणत्या कोपऱ्यात जाऊन बसला
बळीराजा वाट पाहुनी थकला



एकचि मागणे मागतो वरुण देवाला
पड रे पावसा, तृप्त कर धरणी मायला
खुश कर समद्याला नमन वरुण देवाला

पाणी न येण्याचे अनेक परिणाम दिसून येत आहे. पाण्याची बाटली व जार महागलेत. टँकरच्या पाण्याचे भाव अव्वाच्या सव्वा झालेत. सर्वसामान्यांना गंभीर पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. अपंग, निराधार, असहाय हे रस्त्यावर फिरणारे व रात्री फुटपाथवर झोपणारे यांना पिण्याचे पाणी मिळणे मुश्किल झाले आहे. सर्वच जण मोठया आशेने या पावसाची वाट पाहात आहे. उन्हाचा चटका, गरमीच. कडका, तर वरुण राजा रुसण्याचा फटका यामुळे अनेकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. कडक उन्हामुळे उन्हाळी लागणे, उष्माघात वाढणे, पांढऱ्या पेशी कमी किंवा जास्त वाढणे, रक्त कमी होणे, थकवा, रक्तदाब या सारख्या रोगांची लागण होत आहे. तेंव्हा लवकर पाऊस पडावा हीच अपेक्षा. पण या वर्षीची परिस्थिती, चित्र वेगळेच दिसत आहे. मला वाटतेय १९७०-७२ च्या दुष्काळापेक्षाही भयावह परिस्थिती यंदा निर्माण होते की काय ? का तर मी १९७०-७२ ला जेमतेम दहा-बारा वर्षाचा होतो. लहाणपणात का होईना त्या दुष्काळाचे चटके मी स्वतः अनुभवले आहे. तो अनुभव थोडक्यात जरी मांडायचा म्हटले तरी अजुन तरी चार पाने लेखना ने भरतील. तेंव्हा नंतरच्या लेखात मांडतो.




देवाशी हात जोडूनी प्रार्थना करु या, नको रे बाबा पुनश्च दाखवू दुष्काळजन्य भीषण परिस्थिती.

पाऊस येत नसल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रतील कोल्हापूर जिल्हयात खेड्यापाड्यातील, डोंगरपाड्यातील रहिवाशांचे पाण्याविना अतोनात हाल होत आहे. या जिल्हयातील चंदगड, आजरा, गडहिंग्लज, राधानगरी, शाहुवाडी, गगनबावडा या तालुक्यात तसेच अनेक धनगरवाड्या हे अतिदुर्गम भागात येतात. येथे रस्तेच नाही, पाण्यासाठी व दवाखान्यात जाण्यासाठी पाच ते आठ किलोमीटर पायपीट करावी लागते. रुग्णालयात झोळी करुन रुग्ण नेतांना त्या व्यक्तीला, बाईला पाणी न मिळाल्यामुळे आपला जीव नाहक गमवावा लागत आहे. मागील पंधरा दिवसात वाहन न मिळाल्यामुळे दवाखान्यात जाण्यासाठी व पाणी न मिळाल्यामुळे तब्बल दहा व्यक्ती, महिलांना स्वतःचे प्राण गमवावे लागले आहे.

विदर्भातील डोंगरदऱ्यात राहणाऱ्या आदिवासी वर्गाची काय भयावह परिस्थिती चालू आहे. राज्यात सर्वात जास्त तापमान हे अतिकडाक्याचे विदर्भात आहे. का तर पाण्याचे साठे आटत आहे. वाहते झऱ्याला पाणीच नाही. ओसाड डोंगर, दरे दिसत आहे. जंगलातून निघणारे कंद, मुळे इतर आयुर्वेदिक वनस्पती काही लहान मोठे मांसाहारी प्राणी पाऊस येत नसल्यामुळे दिसेनासे झाले आहे. यामुळे यावर उदरनिर्वाह करणारा महिला वर्ग व पुरुषवर्ग यांना मोठ्या अडचणीला, उपासमारी व पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. या आदिवासी महिलां सात-आठ कि.मी. पायी चालून पाणी आणतात व एकवेळचा स्वयंपाक बनवला तर घरातील लहान पोर-पोरी अक्षरशा त्यावर तुटून पडत आहे. मराठवाडा व राज्यातील शेतकरी हा हवालदिल झाला आहे. त्याने कुणी उसनवारीने, कर्जाने पैसा काढून पेरणीची सर्व तयारी केली आहे. पण पाऊस पडायला तयार नाही. पाऊस नाही, त्यातल्या त्यात महागाई गगणाला भिडली यामुळे सर्वसामान्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. धोंडी-धोंडी पाणी दे हे पाऊस गाणे, पाऊस पडण्यासाठीच जुने गाणे समुहाने खेड्यापाड्यात म्हणून वरुण राजाला विनंती करुन मागणं करत आहे. आजच्या तरुणांना हे गाणं माहित नाही. मी लहानपणात त्या समुह गायनात सामील झालेलो आहे. तेंव्हा शेतकरी बळीराजा हा देवाकडे मागणं मागतोय लवकर ये वरुण राजा धरणीमातेला तृप्त कर. सर्वांच्या चेहऱ्यावर हशी, खुशी व आनंद दिसू दे. धनधान्याने आमची कोठार भरपूर भरु दे. शेवटी सर्वच जण पावसाची आतुरतेने वाट पाहतायं. करिता म्हणावेसे वाटतेय उन्हाचा चटका ! गरमीचा कडका !! वरुण राजा रुसण्याचा फटका !!! मराठवाडा महाराष्ट्र दुष्काळाच्या  वाटेवर ?





